मनपा प्रशाला क्र.३ मध्ये वृक्षारोपण करताना विद्यार्थिनी.

# अर्थव्यवस्था व व्यावसायिक अर्थशास्त्र पुस्तकाचे प्रकाशन



**भारतीय अर्थव्यवस्था व व्यावसायिक अर्थशास्त्र पुस्तकाचे प्रकाशन सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. वासुदेव गाडे व कुलगुरू डॉ. एन.एन. मालदार यांच्या हस्ते करण्यात आले.**

प्रतिनिधी । सोलापूर

सोलापूर विद्यापीठात आयोजित कार्यक्रमात बी. ए. भाग एक साठीचे भारतीय अर्थव्यवस्था आणि बी.कॉम. भाग एक साठीचे व्यावसायिक अर्थशास्त्र या दोन्ही पुस्तकाचे प्रकाशन सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. वासुदेव गाडे व कुलगुरू डॉ. एन. एन. मालदार यांच्या हस्ते करण्यात आले.

प्रा. के. एम. भोसले, डॉ. बी. एच. दामजी व डॉ. सी. एस. भानुमते यांनी एकत्रितपणे या दोन्ही पुस्तकांचे लेखन केले आहे. फडके पब्लिकेशनचे प्रकाशन आहे. सोलापूर विद्यापीठाच्या नवीन सीबीसीएस अभ्यासक्रमानुसार लिहिलेली ही क्रमिक पुस्तके आहेत.

शिक्षक आणि विद्यार्थी यांच्याकडून मोठ्या मागणीच्या प्रतिसादाबद्दल कोल्हापूरच्या फडके प्रकाशनच्या मंदार फडके, फडके बुक हाऊस सोलापूरचे तडवळकर यांनी समाधान व्यक्त केले.


सोलापूर विद्यापीठ, सोलापूर
१२ वा वर्धापन दिन समारंभ
दि. १ ऑगस्ट, २०१६
प्रमुख अतिथी
अध्यक्ष